दाखल दि. : १४.०७.२०२१
नोंदणी दि. : २०.०७.२०२१
निकाल दि.: २०.०२.२०२४
कालावधी : ०२ ०७ ०६
वर्षे महिने दिवस

**जत येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी – अमरजीत भा. जाधव)**

**नियमित फौजदारी प्रकरण नं. २१०/२०२१**

CNR : MHSN08-000987-2021

निशाणी क्र. ३४

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र शासन,**<br>तर्फे पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, जत,<br>जि. सांगली. | **... अभियोग पक्ष** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १. मनिषा राजाराम गुरव,<br>वयः ४८ वर्षे, धंदा–घरकाम,<br>२. अमोल राजाराम गुरव,<br>वयः ३१ वर्षे, धंदा–शेती<br>३. विश्वजीत राजाराम गुरव,<br>वयः २८ वर्षे, धंदा–शेती | **... आरोपी** |

४. विनम्र राजाराम गुरव,
वयः २५ वर्षे, धंदा–शिक्षण
सर्व राहणार बनाळी, तालुका–
जत, जिल्हा सांगली.

**दोषारोपः भारतीय दंड संहिता १८६० चे कलम**
**३२४,५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे.**

---------------------------------------

अभियोग पक्षातर्फे – सहा. सरकारी अभियोक्ता श्री. जे. जे. पाटील.
आरोपींतर्फे – विधीज्ञ श्री. एस.एच. व्हनमाने

---------------------------------------

**न्यायनिर्णय**

{घोषीत दिनांक २० फेब्रुवारी, २०२४}

आरोपींची भारतीय दंड संहिता १८६० (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.द.सं.) चे कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये संपरीक्षा घेणेत आली.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः–**

२. दिनांक १९/०५/२०२१ रोजी पहाटे ०२.०० वाजणेच्या सुमारास फिर्यादी–सुभाष गुरव राहणार बनाळी, तालुका–जत, जिल्हा–सांगली (यास येथून पुढे 'फिर्यादी' असे संबोधले आहे) व त्यांची दोन मुले अभिजीत व इंद्रजीत असे त्यांचे शेतात नांगरणीसाठी ट्रॅक्टर आल्याने शेतात गेले होते. त्यावेळी फिर्यादीची भावजय मनिषा गुरव व त्यांचे पुतणे अमोल गुरव, विश्वजीत गुरव व विनम्र गुरव हे तेथे येवून फिर्यादीस म्हणाले की,'शेतीची व्यवस्थीत वाटणी केल्याशिवाय शेताची

नांगरणी करायची नाही'. त्यावेळी फिर्यादींनी त्यांना ते त्यांच्या हिश्याचे शेत नांगरणी करणार आहेत'. त्यावर ते चौघे फिर्यादीच्या अंगावर धावून आले. मनिषा गुरव हिने काठीने अभिजीत यास डोक्यात, पाठीवर, पायावर मारहाण करण्यास सुरुवात केली. अमोल गुरव याने लोखंडी पाईपने अभिजीत व इंद्रजीत यांना पाठीवर, पायावर मारहाण केली. विश्वजीत गुरव याने फिर्यादीस त्याचे हातातील कोयत्याने डावे हाताचे अंगठयाजवळीत बोटास मारहाण केली. विनम्र याने फिर्यादीस काठीने डोकीत, हातावर, पायावर मारहाण करुन तुम्हाला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देवून तेथून निघून गेले. त्यानंतर फिर्यादी व त्यांच्या मुलांनी ग्रामीण रुग्णालय, जत व सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे उपचार घेवून जत पोलीस ठाणे येथे येवून फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरुन जत पोलीस ठाणे अंमलदार यांनी गुन्हा क्र. २३७/२०२१ प्रमाणे भा.द.सं.कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये दिनांक २०/०५/२०२१ रोजी गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस नाईक श्री. बी.बी. थोरात यांनी करुन तपासाअंती प्रस्तुत आरोपीं विरुध्द भा.द.सं.कलम ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी आरोपी यांचे विरुध्द भा.दं.सं. कलम ३२४, ५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निशाणी क्र. ११ प्रमाणे निश्चित केला व आरोपींना समजावून सांगितला असता त्यांनी गुन्हा नाकबूल करून संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. आरोपींवरील दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने यातील फिर्यादी–सुभाष गुरव (अ.सा.क्र.१) यांची साक्ष निशाणी क्र.२५ प्रमाणे, साक्षीदार–अभिजीत गुरव (अ.सा.क्र.२) यांची साक्ष निशाणी क्र.२७ प्रमाणे व साक्षीदार–

इंद्रजीत गुरव (अ.सा.क्र.३) यांची साक्ष निशाणी क्र.२८ प्रमाणे नोंदविली आहे. आरोपींनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा नि.क्र.२९ व वैद्यकीय प्रमाणपत्रे नि.क्र.३० ते नि.क्र.३२ प्रमाणे मान्य केले. फिर्यादी व अभियोगपक्ष यांनी नि.क्र. ३३ च्या पुरशीस अन्वये पुरावा बंद केला. आरोपींविरुध्द गुन्हयात गोवणारा कोणताही पुरावा न आलेने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम, ३१३ प्रमाणेचा जबाब नि.क्र.१ वरील आदेशाप्रमाणे तोहमत करण्यात आला.

६. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले त्यावरून माझे विचारार्थ निघालेले मुद्दे व निष्कर्ष मी कारणेमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदवीत आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | दिनांक १९.०५.२०२१ रोजी पहाटे ०२.०० वाजणेचे सुमारास मौजे बनाळी, तालुका जत, जिल्हा सांगली येथील फिर्यादीच्या शेतात व घरासमोर, आरोपींनी संगनमताने फिर्यादी–सुभाष गुरव व साक्षीदार–अभिजीत गुरव व इंद्रजीत गुरव यांना काठी, लोखंडी पाईप व कोयत्याने मारुन दुखापत केली व त्यानुसार त्यांनी भा.द.सं. कलम, **३२४ सह कलम ३४** प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही |
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून अपमानित केले व अशी शिवीगाळ केल्यास ते प्रक्षोभित होवून सार्वजनिक | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | शांततेचा भंग करतील किंवा त्यांचे हातून अपराध घडेल हे त्यांना ज्ञात असताना देखील किंवा त्याच उद्देशाने त्यांनी प्रक्षोभित केल्याचे व त्यानुसार त्यांनी भा.द.सं. कलम, **५०४ सह कलम ३४** प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारण्याची धमकी दिली व व त्यानुसार त्यांनी भा.द.सं. कलम, **५०६ सह कलम ३४** प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही |
| ४. | अंतिम आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ३ बाबतः

७. वरील मुद्दे एकाच घटनेशी संबंधीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरिता एकत्रीत विचारात घेण्यात आले आहेत.

८. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

९. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी–सुभाष गुरव (अ.सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले की, घटना दिनांक १९/०५/२०२१ रोजी रानात

वाटणीवरुन घडली होती. तेथे आरोपी व त्यांची किरकोळ वादावादी झाली होती. त्यांनी तक्रार दाखल केली होती पण त्यातील मजकूर आठवत नाही.

१०. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार–अभिजीत गुरव (अ.सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले की, घटना कधी घडली होती हे त्यांना आठवत नाही. त्यांना आरोपींनी मारहाण केली होती की कसे, हे त्यांना आठवत नाही.

११. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार–इंद्रजीत गुरव (अ.सा.क्र.३) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले की, तेथे जमिनीसाठी किरकोळ वादावादी झाली होती परंतु शिवीगाळ व मारहाण झाली नव्हती.

१२. सरकारी अभियोक्ता यांनी सदर फिर्यादी व साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने त्यांना उलटतपासात विचारले जाणारे प्रश्न विचारले असता त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना अनुक्रमे फिर्याद मधील अधोरेखांकीत भाग 'अ' व जबाबातील अधोरेखांकीत भाग 'अ' प्रमाणे प्रकार घडला नाही अशी उत्तरे दिली. आरोपींनी त्यांना काठीने, लोखंडी पाईपने व कोयत्याने मारहाण केल्याचे नाकारले. आरोपी हे अनुक्रमे त्यांची भावजय व भावाची मुले, त्यांची चुलती व चुलत भाऊ असून त्यांचेत आपसात मिटले असल्याचे मान्य केले आहे.

१३. अभियोग पक्षाच्या एकंदरित पुराव्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, आरोपी यांनी नि.क्र. २३ वर अर्ज देवून सदर प्रकरण मिटविणेची विनंती केली. परंतु सदरचा गुन्हा मिटणेस पात्र नसलेने सदरचा अर्ज नामंजूर करणेत आला. फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र. २४ वर संयुक्त पुरशीस दाखल करुन चर्चा करुन सदरची केस आपसात मिटविली असल्याचे कथन केले. अभियोगपक्षाने विचारलेल्या सुचक प्रश्नांमधून काही एक उपयुक्त पुरावा आरोपींविरुध्द आलेला नाही. फिर्यादी यांनी प्रथम खबरी अहवालाप्रमाणे व

साक्षीदार यांनी तपासटिपणातील अधोरेखांकीत भाग 'अ' प्रमाणे घटना घडल्याचे नाकारले आहे. निशाणी क्र.२९ वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा व निशाणी क्र.३० ते ३२ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रे जरी आरोपींच्या वकीलांनी मान्य केले असली तरी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना काठी, लोखंडी पाईप व कोयत्याने मारले, शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली ही घटना फिर्यादी (अ.सा.क्र.१) व अभिजीत गुरव (अ.सा.क्र.२) व इंद्रजीत गुरव (अ.सा.क्र.३) यांनी स्पष्टपणे साक्षीमध्ये सांगितले नाही.

१४. अभियोग पक्षातर्फे दाखल केलेल्या वरील एकत्रित पुराव्यावरून सदर प्रकरणामध्ये आरोपींनी फिर्यादीस व साक्षीदार यांना काठीने, लोखंडी पाईपने व कोयत्याने मारहाण केली, शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी फिर्यादी व साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्ष संशयापलिकडे जावून सिध्द करु शकत नाही. अशा परिस्थीतीमध्ये घटनेतील फिर्यादी व साक्षीदार हे जर घटना स्पष्टपणे सांगत नसेल तर त्यांच्या वरील साक्षी पुराव्यावरुन आरोपींवरील दोषारोप संशयापलीकडे जावून सिध्द होत नाहीत. सबब अभिलेखावरील पुराव्या अभावी आरोपीं वरील आरोप संशयापलीकडे जावून सिध्द होत नाहीत. सबब मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>**

१५. मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी आहेत त्यामुळे यातील आरोपी सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. सबब या मुद्दयाचे उत्तरासाठी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. **आरोपी क्र.१ मनिषा राजाराम गुरव, आरोपी क्र.२ अमोल राजाराम**

**गुरव, आरोपी क्र.३ विश्वजीत राजाराम गुरव व आरोपी क्र.४ विनम्र राजाराम गुरव** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम **२४८(१)** अन्वये भारतीय दंड संहिता कलम **३२४,५०४,५०६** सह **३४** या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींनी दिलेले बंधपत्रे व जामीन रद्द करण्यात येत आहेत.

३. पोलीस ठाणे, जत येथील मालमत्ता नोंदवही क्र.१४६/२०२१ एक लोखंडी कोयता हे उपयुक्त असलेने त्यांची अपीलकालावधीनंतर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम सरकार जमा करणेत यावी.

४. पोलीस ठाणे, जत येथील मालमत्ता नोंदवही क्र.१४६/२०२१ वरील एक लोखंडी पाईप व काठी हे मुल्यहिन असलेने ते अपीलकालावधी नंतर कायदयातील तरतुदीनुसार नाश करण्यात यावेत.

५. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ चे पूर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रु. १०,०००/– चे वैयक्तिक बंधपत्रे व तेवढेच रकमेचे जामीन दयावे, की जे आजपासून ६ महिन्यांसाठी अंमलात असेल.

६. सदर आदेशाची प्रत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ प्रमाणे जिल्हा दंडाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)**

**सही/–**

**दिनांक २०/०२/२०२४** (**अमरजीत भा. जाधव**)

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**

**जत.**

मी प्रमाणित करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ न्यायनिर्णय मधील मजकूर हा एकसारखा आहे.

स्टेनोग्राफरचे नांवः व्ही. आर. पाटील, कनिष्ठ लिपिक

कोर्टाचे नांव : अमरजीत भा. जाधव

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जत.

निकालाचा दिनांकः २०.०२.२०२४

पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली

तारीखः २०.०२.२०२४

न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीखः २८.०२.२०२४